# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.क्रिडा समिती
## कार्यपत्रिका क्रमांक :- १३
## सभावृत्तांत

दिनांक :- ०७/०४/२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७/०४/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.सुमनताई मधुकर पवळे
३) मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
४) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
५) मा.जाधव विजया अशोक (मामी)

याशिवाय मा.चाकणकर-उपनगरसचिव,मा.पानसरे-क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक :-२) महापौर चषक राज्यस्तरीय शुटींग बॉल स्पर्धा २०१० आयोजित करणेबाबत- मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३) महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०१० आयोजित करणेबाबत- मा.राजेंद्र काटे, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४) मे.गिनिज स्पोर्टस्, पुणे २६ यांचेकडून म.न.पा.च्या व्यायामशाळांकरीता व्यायाम साहित्य खरेदी करणेबाबत- मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-५) क्रिकेट प्रशिक्षण शिबीरकरीता शुल्क निश्चित करणेबाबत- मा.प्रेमकुमार नायर, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

---

मा.विजया जाधव :- मा.क्रिडा समिती सभा दिनांक १७/३/२०१० ठराव क्रमांक ३१ मध्ये - “दिनांक :- ५/२/२०१०” या मजकुराऐवजी “दिनांक :- १७/३/२०१०” हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत यावी.

अ) मा.क्रिडा समिती सभा दिनांक १७/३/२०१० ठराव क्रमांक ३१ मध्ये- “दिनांक :- ५/२/२०१०” या मजकुराऐवजी “दिनांक :- १७/३/२०१०” हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्तीसह दि.१७/२/२०१०, ३/३/२०१० व १७/३/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि.१७/३/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १२) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

ठराव क्रमांक :- ३५ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०७/०४/२०१० विभाग :- क्रीडा
सुचक :- मा.राजेंद्र काटे अनुमोदक :-मा.विजया जाधव
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/ग्रं/कावि/६४०/२००९ दि.१८/११/२००९
विषय :- म.न.पा. जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता,देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामाचे दुसऱ्या वर्षाचे दरांस मान्यता देणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले -</u>

ठराव क्रमांक :- ३६ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०७/०४/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.राजेंद्र काटे
संदर्भ :- मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा शुटिंग बॉल असो. यांचे मान्यतेने, माहे एप्रिल २०१० मध्ये ३ दिवस वाघेश्वर विद्यालय,चऱ्होली,पुणे येथे महापौर चषक राज्यस्तरीय शुटिंग बॉल स्पर्धा २०१० आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे र.रु.७,९३,४८०/- च्या खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ३७ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०७/०४/२०१०
सुचक :- मा.राजेंद्र काटे अनुमोदक :- मा.सुमनताई पवळे
संदर्भ :- मा.राजेंद्र काटे,मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कबड्डी असो. यांचे मान्यतेने, माहे जून २०१० मध्ये कै.धोंडीबा उर्फ गणपत फुगे क्रीडा संकुल, सँडविक कॉलनी, भोसरी येथे महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २०१० आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ३८ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०७/०४/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :- मा.राजेंद्र काटे
संदर्भ :- मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

म.न.पा.च्या व्यायाम शाळेकरीता व्यायाम साहित्य पुरविणेकामी मे.गिनिज स्पोर्टस्, पुणे २६ यांचेशी करारनामा करुन या करारनाम्यानुसार क्रीडा विभागाकडील उपलब्ध तरतुदीनुसार गिनिज स्पोर्टस् पुणे २६ यांचेकडून म.न.पा. व्यायाम शाळांकरीता व्यायाम साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक :- ३९ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०७/०४/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :- मा.राजेंद्र काटे
संदर्भ :- मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव...

म.न.पा.च्या वतीने कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम व मदनलाल धिंग्रा मैदान येथे क्रिकेट प्रशिक्षण शिबीर आयोजित केले जाते. या क्रिकेट प्रशिक्षण शिबीरात सहभागी होणाऱ्या म.न.पा. शालेय विद्यार्थ्यांना विनामुल्य व खाजगी शालेय विद्यार्थ्यांकडून दरमहा र.रु.१५०/- इतके शुल्क निश्चित करणेस मान्यता देणेत यावी अशी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/४८०/२०१०
दिनांक :- ०९/०४/२०१०

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.